# जिल्हा पोलीस राजपत्र

## पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर

### सन-२०२४

जावक क्रं. 2815 दिनांक 21 MAY 2024

## [अंक क्रं.१७/२०२४]

### [दिनांक २२/०४/२०२४ ते २६/०४/२०२४]

**अनुक्रमनिका**

**(१) बदली/ पदोन्नती/ प्रतिनियुक्ती**

**(२) रजा**

**(३) वेतन**

**(४) बक्षीस**

**(५) प्रशिक्षण**

**(६) विभागीय चौकशी व शिक्षा**

**(७) सेवाप्रवेश /सेवानिवृत्ती /बडतर्फ**

**(८) संकिर्ण**

महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक, कार्यालय लोहमार्ग, वंजारी नगर,
पाण्याच्या टाकी जवळ, अजनी, नागपूर 440027
दुरध्वनी क्र. 0712-2743984 E-mail - sp.railways.nagpur@mahapolice.gov.in

क्रमांक : पोअलोना/ आस्था-२/पोलीस पत्रिका/२०२४ /2865 नागपूर, दिनांक /०५/२०२४ 21 MAY 2024

**पोलीस पत्रिका अंक. क्र. १७ /२०२४ दिनांक २२/०४/२०२४ ते २६/०४/२०२४**

# अनुक्रमनिका

## (१) बदली/ पदोन्नती/ प्रतिनियुक्ती

**०१) क्रमांक :पोअलोना/पशा-३/फा.क्र.६/बदली/१९१७/२०२४ नागपूर दि.२३/०४/२०२४ अन्वये**

**-: आदेश :-**

श्रीमती अश्विनी पाटील, सहायक पोलीस निरीक्षक, सायबर सेल, लोहमार्ग नागपूर यांची कायदा व सुव्यवस्था बंदोबस्ताकरीता लोहमार्ग पोलीस ठाणे नागपूर येथे तात्पुरत्या स्वरुपात पाठविण्यात येत आहे.

श्रीमती अश्विनी पाटील सहायक पोलीस निरीक्षक, सायबर सेल, लोहमार्ग नागपूर यांच्या बंदोबस्ताकामी प्रभारी पोलीस अधिकारी, सायबर सेल, लोहमार्ग नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती अनिता खेडकर, पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा, व प्रभारी पोलीस अधिकारी, बॉम्ब शोधक व नाशक पथक, लोहमार्ग नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. नितीन अवधुत, पोलीस उपनिरीक्षक, श्वान पथक, लोहमार्ग नागपूर हे स्वतःचे कामकाज पाहुन सांभाळतील.

**२)क्रः पोअलोना/आस्था/मपोहवा-६२८,मपोशि-९८२/२०२४/१९७३ नागपूर दि.२६/०४/२०२४ अन्वये**

विषय :- मपोहवा/६२८ विजया मेहर, मपोशि/९८२ राजश्री डोईफोडे यांना पोलीस अधीक्षक, कार्यालय लोहमार्ग नागपूर येथे त्यांचे मुळ घटकात हजर करुन घेण्याबाबत.
संदर्भ :-अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय पत्र क्र.पोमसं/मबाअप्रवि/४२(४)/जिल्हा प्रतिनियुक्ती/०३ (अ)/२०१८ दि.१५/०३/२०२४

--००--

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग पथक तसेच सध्या या घटकामध्ये महिला शाखा येथे प्रतिनियुक्तीवर असलेले मपोहवा/६२८ विजया मेहर तसेच वाचक शाखा येथे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले मपोशि/९८२ राजश्री डोईफोडे यांना त्यांचे मुळ घटकात हजर घेण्याबाबतची कार्यवाही करणेबाबत पत्र प्राप्त झाले आहे.

करीता महिला शाखा येथे प्रतिनियुक्तीवर असलेले मपोहवा/६२८ विजया मेहर तसेच वाचक शाखा येथे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले मपोशि/९८२ राजश्री डोईफोडे यांना त्यांचे मुळ घटकमध्ये पोलीस अधीक्षक कार्यालय लोहमार्ग नागपूर येथे महिला शाखा तसेच वाचक शाखा येथे हजर करुन घेण्यात येत आहे.

**३) क्रमांक :पोअलोना/आस्था/चापोशि/२०२४/१९१० नागपूर दि.२२/०४/२०२४ अन्वये**

**-: आदेश :-**

**विषयः- नवनियुक्त चालक पोलीस शिपाई यांची नेमणुक केल्याने कार्यरत चालक अंमलदार यांना परत करणेबाबत.**

**संदर्भ :- या कार्यालयाचे आदेश क्रमांकःपोअलोना/आस्था/चापोशि/प्रथम नेमणुक/२०२४/१३१४ दिनांक १४/०३/२०२४**

--००--

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, नवनियुक्त करण्यात आलेल्या चालक अंमलदारांची विविध पोलीस स्टेशनला नेमणुका करण्यात आलेल्या आहेत ते नवनियुक्त अंमलदार हे चालकांचे पदावर नियुक्त केले असल्याने त्यांची प्रामुख्याने चालकाचे कर्तव्य आहे. तथापि हयांच्या नेमणुका होण्याचे पुर्वी चालक म्हणुन काम करीत असलेले अंमलदार हयांना चालक म्हणुन काम करता येवू शकणार नाही. त्यांचे हयापुढील काम हे त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणी नेमूण दिलेले काम करणे अगत्याचे आहे.

करीता यापुढे असे आदेश देण्यात येते की, सन २००९, २०२०, २०२२ तसेच सन २०१२ पासुन चालक म्हणुन काम करीत असलेले हे पोलीस अंमलदार त्यांच्या मुळ नेमणुकीच्या ठिकाणी परत जावून त्यांच्या प्रभारी अधिकारी यांनी नेमणुक दिलेली कामे करावीत. तसेच नवनियुक्त केलेल्या चालकांनी वाहन चालविण्याचे काम प्राधान्याने करावे व प्रभारी अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे वेळोवेळी पालन करावे.

## (२) रजा

**१) क्र.पोअलोना/पशा-३/वेफा मादेश्वार/१९११/२०२४ नागपूर दि.२२/०४/२०२४ अन्वये**

-: आदेश :-

श्री. दिलीप मादेशवार राखीव पोलीस उपनिरीक्षक, लोहमार्ग पोलीस मुख्यालय, लोहमार्ग नागपूर यांची महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील ६१(ब) नुसार सदर कालावधीची ३० दिवस परिवर्तीत रजा खर्ची घालता येणची तरतुद असल्याने (प्रशासन आवश्यकता वाटप असल्यास रजेवरुन परत आल्यावर वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करण्यात येईल या अटीवर) दिनांक २७/०४/२०२४ पासुन ३० दिवस अर्धवेतनी किंवा रजेच्या दुप्पट ६० दिवस परिवर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

**२)क्रं.पोअलोना/पशा-१/अर्जित रजा/कश्रेलि-झाडे/२०२४/१९६१ नागपूर दि.२५/०४/२०२४ अन्वये**

**-: आदेश :-**

श्री. जयवंत रामाजी झाडे, कनिष्ठ श्रेणी लिपीक, पशा-१ व आस्था-२ कार्यालय पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर यांची महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ मधील रजा नियम ५० नुसार दिनांक **२९/०४/२०२४ ते ०३/०५/२०२४ पर्यत ०५ दिवस अर्जीत** रजा तसेच रजेच्या पुर्वी दि.२७ व २८/०४/२०२४ व रजेच्यानंतर दि.०४ व ०५/०५/२०२४ रोजी शासकीय सुट्टी असल्याने मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह रजा मंजुर करयात येत आहे

**३)क्र.पोअलोना/आस्था-१/पोशि-९०७/परिवर्तीत रजा/२०२४/१९२२ नागपूर दि.२३/०४/२०२४ अन्वये**

-: आदेश :-

पोशि/९०७ योगेश कुंजाम नेम. रेपोस्टे गोंदिया यांचा दि.१२/०३/२०२४ ते २६/०३/२०२४ पर्यत एकुण १५ दिवसाचा सिक कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील नियम ६१ (ब) अन्वये परिवर्तीत रजेत मंजुर करण्यात येत आहे.

**४)क्र.पोअलोना/आस्था-१/पो.अंम/परिवर्तीत -अर्जित रजा/२०२४/१९२१ नागपूर दि.२३/०४/२०२४**

-: आदेश :-

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा सिक कालावधी खालील दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील नियम ६१ (ब) व ५० अन्वये परिवर्तीत/अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव/ब.नं./हुद्या/नेमणुक | सिक कालावधी | एकुण दिवस |
|---|---|---|---|
| १ | सफौ/५६७ दुर्योधन भजभुरे, नेम. रेपोस्टे, गोंदिया | ३०/१२/२०२३ ते ३०/०१/२०२४ | ३२ दिवस परिवर्तीत रजा |
| २ | मपोहवा/२०२ गिता नागदेवे नेम.रेपोस्टे, बडनेरा | १०/०२/२०२४ ते १९/०२/२०२४ | १० दिवस परिवर्तीत रजा |
| ३ | मपोहवा/१०१९ अनिता इंगळे, नेम. रेपोस्टे, वर्धा | १७/०१/२०२४ ते २९/०१/२०२४ | १३ दिवस परिवर्तीत रजा |
| ४ | पोहवा/५१७ अमर राठोड,नेम.रेपास्टे अकोला | ०३/०२/२०२४ ते ०६/०२/२०२४ | ०४ दिवस परिवर्तीत रजा |
| ५ | पोहवा/१०२४ अनिल अवचार, नेम.रेपोस्टे, अकोला | २१/०२/२०२४ ते १३/०३/२०२४ | २२ दिवस परिवर्तीत रजा |
| ६ | मपोशि/२१० प्रितीलता लांजेवार, नेम.रेपोस्टे, अकोला | ०९/०१/२०२४ ते १८/०२/२०२४ | ४१ दिवस परिवर्तीत रजा |
| ७ | पोशि/१९९ धम्मपाल गवई, नेम.रेपोस्टे, इतवारी | १७/०२/२०२४ ते २८/०२/२०२४ | १२ दिवस परिवर्तीत रजा |
| ८ | मपोशि/८१६ किरण भोयर, नेम.रेपोस्टे,इतवारी | २६/०१/२०२४ ते ३१/०१/२०२४ | ०६ दिवस परिवर्तीत रजा |
| ९ | श्रेणी पोउपनि/४६१ सुरेन्द्र सावळे, नेम.रेपोस्टे, इतवारी | ०४/०२/२०२४ ते २२/०२/२०२४ | १९ दिवस परिवर्तीत रजा |
| १० | सफौ/२८९ पुंडलीक धोटे, नेम.पोलीस मुख्यालय | १७/०२/२०२४ ते ०५/०३/२०२४ | १८ दिवस परिवर्तीत रजा |
| ११ | सफौ/३५७ नितीन मेहर, नेम. पोलीस मुख्यालय | २२/०२/२०२४ ते ०५/०३/२०२४ | १३ दिवस परिवर्तीत रजा |
| १२ | मपोहवा/४६४ ममता डोहरे, नेम. पोलीस मुख्यालय | १५/०२/२०२४ ते १७/०३/२०२४ | ३२ दिवस परिवर्तीत रजा |
| १३ | पोशि/५९६ प्रशांत भांडारकर, नेम. पोलीस मुख्यालय | १५/०२/२०२४ ते २५/०२/२०२४ | ११ दिवस परिवर्तीत रजा |
| १४ | पोशि/११९४ दर्शन झाडे, नेम. पोलीस मुख्यालय | १९/०३/२०२४ ते १०/०४/२०२४ | २३ दिवस परिवर्तीत रजा |
| १५ | पोशि/३४ विशाल कथिलकर, नेम. पोलीस मुख्यालय | ३०/०३/२०२४ ते ११/०४/२०२४ | १३ दिवस परिवर्तीत रजा |
| १६ | पोशि/११४३ सचिन बान्ते, नेम. पोलीस नियंत्रण कक्ष | ०८/०२/२०२४ ते २५/०२/२०२४ | १८ दिवस परिवर्तीत रजा |
| १७ | सेनि.सफौ/९६२ लक्ष्मीकांत गुजर, नेम.पोलीस नियंत्रण कक्ष | ०९/०२/२०२४ ते २०/०२/२०२४ | १२ दिवस परिवर्तीत रजा |
| | | १५/०३/२०२४ ते २६/०३/२०२४ | १२ दिवस परिवर्तीत रजा |
| १८ | पोशि/६६ सुशिल शिंदे, नेम. सायबर सेल | १७/०२/२०२४ ते १४/०३/२०२४ | २७ दिवस परिवर्तीत रजा |
| १९ | मपोशि/२६९ ज्योती मिश्रा, नेम. सायबर सेल | २५/०१/२०२४ ते २१/०२/२०२४ | १० दिवस परिवर्तीत रजा<br>१८ दिवस अर्जित रजा |
| २० | मपोशि/९४९ ज्योती नेवारे,नेम.रेपोस्टे, नागपूर | २८/०१/२०२४ ते १५/०२/२०२४ | १० दिवस परिवर्तीत रजा<br>०९ दिवस अर्जित रजा |
| २१ | सफौ/९७१ ओमप्रकाश वडतकर, नेम.रेपोस्टे अकोला | ०६/०२/२०२४ ते १७/०२/२०२४ | ०५ दिवस परिवर्तीत रजा<br>०७ दिवस अर्जित रजा |
| २२ | मपोशि/११६९ सोनिका मेश्राम, नेम.रेपोस्टे, इतवारी | ०९०२/२०२४ ते १७/०२/२०२४ | ०९ दिवस अर्जित रजा |
| २३ | पोशि/७५० प्रमोद पिकलमुंडे, नेम.रेपोस्टे, इतवारी | ०३/०१/२०२४ ते ०५/०२/२०२४ | ३४ दिवस अर्जित रजा |

**५)क्र.पोअलोना/पशा-३/वैफा/चौधरी/१९१९/२०२४ नागपूर दि.२३/०४/२०२४ अन्वये**

-: आदेश :-

श्री. कविकांत चौधरी, सहायक पोलीस निरीक्षक, लोहमार्ग पोलीस टाणे नागपूर यांचा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील ६१ (ब) अन्वये रुगण कालावधी वैद्यकिय प्रमाणपत्रांच्या आधारे खालील नमुद केल्याप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पासुन | | पर्यत | मंजुर करण्यात आलेली रजा |
|---|---|---|---|---|
| १ | दिनांक १५/०३/२०२४ | ते | दिनांक ०७/०४/२०२४ | २४ दिवस परिवर्तीत रजा |

## (३) वेतन

---०० निरंक ००---

## (४) बक्षीस

---०० निरंक ००---

## (५) प्रशिक्षण

---०० निरंक ००---

## (६) विभागीय चौकशी व शिक्षा

**०१)क्र.पोअलोना/वि.चौ./कसुरी-सपोनि गाढवे/रेपोस्टे अकोला/१२२४/२०२४ नागपूर दि.२३/०४/२०२४**

-: अंतिम आदेश :-

**कसुरदाराचे नांव व पदनाम :-** श्रीमती अर्चना गाढवे,सपोनि रेपोस्टे अकोला

**वाचा :-** १) वाचक शाखा यांचे खुलासा पत्र क्रमांक आर/२३/खुलासा/१११/२०२४ दि.२०.०२.२०२४

२) आपले जावक क्रमांक ७९६/२०२४ दिनांक २६०३.२०२४ रोजी सादर केलेले स्पष्टीकरण

**संक्षिप्त कसुरी :-** आपण लोहमार्ग पोलीस ठाणे अकोला येथे कार्यरत आहात. मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र लोहमार्ग महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिनांक २५.०१.२०२४ रोजी नागपूर लोहमार्ग घटकातील Mission Trusted Policing या उपक्रमांची आढावा बैढक घेण्यात आलेली होती.

सदर आढावा बैढक दरम्यान Mission Trusted Policing अंतर्गत पोलीस ठाण्याच्या दर्शनिय भागात लावण्यात येणारा बोर्ड रेल्वे पोलीस स्टेशन अकोला येथे आपण अद्यावत केलेला नव्हता. सदर बोर्ड अद्यावत करणे आवश्यक होते. सदर बाबत आपला निष्काळजीपणा दिसुन येत आहे.

आपण प्रभारी अधिकारी म्हणुन जबाबदारीच्या पदावर कार्यरत असल्याने आपल्या कर्तव्याचा एक भाग असुन आपण आपल्या कर्तव्यात निष्काळजीपणा केल्याचे उपरोक्त बाबीवरुन निदर्शनास आलेले आहे.

वरील कसुरा बाबत आपणास या कार्यालयाचे वाचक शाखा यांचे संदर्भाकित क्रमांक -०१ अन्वये सदर कसुरी बाबत खुलासा सादर करणे बाबत खुलासा पत्र देण्यात आले होते. सदर खुलासा पत्रावर आपण वरील संदर्भाकीत क्रमांक -२ अन्वये स्पष्टीकरण सादर केले आहे. व आपण सादर केलेल्या स्पष्टीकरणाचा सहाणुभूतीपुर्वक अवलोकन केले असता ते समाधानकारक वाटत नसल्याने ते अस्विकार्य आहे. आपण केलेल्या कसुरीचे स्वरुप पाहुन सबब प्रस्तुत प्रकरणी सांगोपांग विचार करता आपणास "सक्षम प्राधिकारी" म्हणुन मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**-: आदेश :-**

श्रीमती अर्चना गाढवे सपोनि नेमणुक रेल्वे पोलीस स्टेशन अकोला यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (२) अन्वये सक्षम प्राधिकारी या नात्याने दिलेल्या अधिकाराचा वापर करुन आपण केलेल्या कसुरी बद्दल "सक्त ताकिद" शिक्षा देण्यात येत आहे. भविष्यात अश्या घटनांची पुनर्रावृत्ती होणार नाही यांची आपण दक्षता घ्यावी.

श्रीमती अर्चना गाढवे सपोनि नेमणुक रेल्वे पोलीस स्टेशन अकोला हे या आदेशामुळे व्यथित होत असल्यास ते हा आदेश प्राप्त तारखेपासुन ६० दिवसांचे आंत पोलीस महासंचालक, लोहमार्ग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना (दोन प्रतित) अपिल अर्ज सादर करु शकतात.

**०२)क्र.पोअलोना/वि.चौ./कसुरी-सपोनि मुंढे/रेपोस्टे बडनेरा/१२२३/२०२४ नागपूर दि.२३/०४/२०२४**

-: अंतिम आदेश :-

**कसुरदाराचे नांव व पदनाम :-** श्री. उमेश मुंढे,सपोनि रेपोस्टे बडनेरा

**वाचा :-** १) वाचक शाखा यांचे खुलासा पत्र क्रमांक आर/२३/खुलासा/१०९/२०२४ दि.२०.०२.२०२४

२) आपले जावक क्रमांक ३२४/२०२४ दिनांक २५.०२.२०२४ रोजी सादर केलेले स्पष्टीकरण

**संक्षिप्त कसुरी :-** आपण लोहमार्ग पोलीस ठाणे बडनेरा येथे कार्यरत आहात. मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र लोहमार्ग महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिनांक २५.०१.२०२४ रोजी नागपूर लोहमार्ग घटकातील Mission Trusted Policing या उपक्रमांची आढावा बैढक घेण्यात आलेली होती.

दिनांक २५.०१.२०२४ रोजी नागपूर लोहमार्ग घटकातील Mission Trusted Policing आढावा बैटकी दरम्यान Mission Trusted Policing अंतर्गत पोलीस ठाण्याच्या दर्शनिय भागात लावण्यात येणारा बोर्ड आपण रेपोस्टे बडनेरा येथे लावलेले नव्हता. सदर बोर्ड लावणे आवश्यक होते. सदर बाबत आपला निष्काळजीपणा दिसुन येत आहे.

आपण प्रभारी अधिकारी म्हणुन जबाबदारीच्या पदावर कार्यरत असल्याने आपल्या कर्तव्याचा एक भाग असुन आपण आपल्या कर्तव्यात निष्काळजीपणा केल्याचे उपरोक्त बाबीवरुन निदर्शनास आलेले आहे.

वरील कसुरा बाबत आपणास या कार्यालयाचे वाचक शाखा यांचे संदर्भाकित क्रमांक -०१ अन्वये सदर कसुरी बाबत खुलासा सादर करणे बाबत खुलासा पत्र देण्यात आले होते. सदर खुलासा पत्रावर आपण वरील संदर्भाकीत क्रमांक -२ अन्वये स्पष्टीकरण सादर केले आहे. व आपण सादर केलेल्या स्पष्टीकरणाचा सहाणुभूतीपुर्वक अवलोकन केले असता ते समाधानकारक वाटत नसल्याने ते अस्विकार्य आहे. आपण केलेल्या कसुरीचे स्वरुप पाहुन सबब प्रस्तुत प्रकरणी सांगोपांग विचार करता आपणास "सक्षम प्राधिकारी" म्हणुन मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**-: आदेश :-**

श्री. उमेश मुंढे सपोनि नेमणुक रेल्वे पोलीस स्टेशन बडनेरा यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (२) अन्वये सक्षम प्राधिकारी या नात्याने दिलेल्या अधिकाराचा वापर करुन आपण केलेल्या कसुरी बद्दल "सक्त ताकिद" शिक्षा देण्यात येत आहे. भविष्यात अश्या घटनांची पुनर्रावृत्ती होणार नाही यांची आपण दक्षता घ्यावी.

श्री. उमेश मुंढे सपोनि नेमणुक रेल्वे पोलीस स्टेशन बडनेरा हे या आदेशामुळे व्यथित होत असल्यास ते हा आदेश प्राप्त तारखेपासुन ६० दिवसांचे आंत पोलीस महासंचालक, लोहमार्ग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना (दोन प्रतित) अपिल अर्ज सादर करु शकतात.

**०३) क्रमांक :पोअलोना/वि.चौ./कसुरी- पोशि/९०७ कुंजाम/१९०८/२०२४नागपूर दि.२२/०४/२०२४**

**-: अंतिम आदेश :-**

**कसुदराचे नांव व पदनाम:-** पोशि/९०७ योगेश कुंजाम,नेम.रेपोस्टे, गोंदिया

**वाचा :-** १) या कार्यालयाचे का.दा.नोटीस क्रमांक पोअलोना/वि.चौ/कसुरी -पोशि-९०७/ गैरहजर/ ५०१ /२०२४ नागपूर, दिनांक ३१/०१/२०२४
२)आपले जा.क्र. ३९४/२०२४ दिनांक १५/०२/२०२४

**संक्षिप्त कसुरी :-** आपण पोलीस मुख्यालय,लोहमार्ग नागपूर येथे कार्यरत असुन आपली दि.०१/०१/२०२४ रोजी ०९.०० वा. ते २१.०० वा पावेतो स्टेशन डयुटी असताना ते रात्री २१.०० वा घेतलेल्या रोलकॉलवर गैरहजर राहिल्याने आपली गैरहजर नोंद घेण्यात आली होती. दि. ०४/०१/२०२४ रोजी ते पोस्टेला हजर होवून कर्तव्यावर हजर करुन घेणे बाबत लेखी अर्ज सादर केलेले असता आपणास १३.३३ वा कर्तव्यावर हजर करुन घेण्यात आले. आपण आपले लेखी अर्जात नमुद केले की दि.०२/०१/२०२४ व ०३/०१/२०२४ रोजी प्रकृती खराब झाल्याने कर्तव्यावर हजर होवू शकले नाहीत. परंतु आपण प्रकृती खराब बाबतचे कोणत्याही वैद्यकिय प्रमाणपत्र सादर केले नाही. त्यावरुन ते नमुद कालावधीत जाणूनभूजून आपले कर्तव्यावर गैरहजर होते असे दिसून येत आहे.

आपण आपल्या कर्तव्यावरुन प्रभारी अधिकारी यांना कोणतीही पूर्व सुचना न देता /वैद्यकिय प्रमाणपत्र सादर न करता वारंवार अनाधिकृतपणे गैरहजर असल्यामुळे कार्यालयीन शिस्तीवर कामकाजावर प्रतिकूल परिणाम होत असून आपली अनधिकृत गैरहजेरी म्हणजे बेशिस्त वर्तणुक असून आपण शासन परिपत्रक क्रमांक अरजा-२०१६/प्र.क्र. ८४/सेवा-६, दिनांक १० ऑक्टोंबर २०१७ मध्ये दिलेल्या निर्देशा प्रमाणे कार्यवाहीस पात्र ठरता.

वरील कसुरी बाबत आपणास या कार्यालयाचे संदर्भाकित क्रमांक -१ चे आदेशान्वये मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (२) अन्वये आपणास रुपये २०००/- (अक्षरी दोन हजार रुपये फक्त) आर्थिक दंडाची शिक्षा देण्यात का करण्यात येवू नये शिक्षा प्रस्तावित करुन कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली होती. सदर कारणे दाखवा नोटीसवर आपण वरील संदर्भाकीत क्रमांक-२ अन्वये स्पष्टीकरण सादर केले आहे. सदर प्रकरणात अंतिम निर्णय घेण्यापुर्वी दिनांक ०५/०४/२०२४ रोजी आपणास आज्ञांकित कक्षात वैयक्तीक सुनावणी करीता बोलावण्यात आले असता आपण हजर झाले आपणास बचावाची संधी दिली व काही सांगावयाचे आहे का ? याबाबत विचारणा केली असता आपण स्वत:ची तब्येत ठिक नसल्या कारणास्तव गैरहजर राहीले असे कथन केलेले असुन आपण सादर केलेल्या स्पष्टीकरणाचा सहाणुभूतीपुर्वक अवलोकन केले असता ते समाधानकारक वाटत नसल्याने ते अस्विकार्य आहे. आपण केलेल्या कसुरीचे स्वरुप पाहुन आपणास कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावीत केलेल्या शिक्षेमध्ये अंशत:बदल करुन सबब प्रस्तुत प्रकरणी सांगोपांग विचार करता आपणास "सक्षम प्राधिकारी" म्हणुन मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**-: आदेश :-**

पोशि /९०७ योगेश कुंजाम नेमणुक रेल्वे पोलीस स्टेशन गोदिंया यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (२) अन्वये सक्षम प्राधिकारी या नात्याने दिलेल्या अधिकाराचा वापर करुन आपण केलेल्या कसुरी बद्दल "रुपये ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त)" आर्थिक दंडाची शिक्षा देण्यात येत आहे. भविष्यात अश्या घटनांची पुनर्रावृत्ती होणार नाही याची आपण दक्षता घ्यावी.

पोशि /९०७ योगेश कुंजाम नेमणुक रेल्वे पोलीस स्टेशन गोदिंया हे या आदेशामुळे व्यथित होत असल्यास ते हा आदेश प्राप्त तारखेपासुन ६० दिवसांचे आंत पोलीस महासंचालक, लोहमार्ग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना (दोन प्रतित) अपिल अर्ज सादर करु शकतात.

**०४) क्रमांक :पोअलोना/वि.चौ./कसुरी- पोहवा-३१३ ठाकुर/१९०७/२०२४नागपूर दि.२२/०४/२०२४**

**-: अंतिम आदेश :-**

**कसुदराचे नांव व पदनाम:-** पोलीस हवालदार/३१३ बाबुसिंग ठाकुर,नेमणुक.रेल्वे पोलीस स्टेशन नागपूर

**वाचा :-** १) रे.पो.स्टे नागपूर यांचे विचारणा पत्र दिनांक ०६/०२/२०२४

२)आपले जावक क्रमांक निल/२०२४ दिनांक ०९/०२/२०२४रोजी सादर केलेले स्पष्टीकरण

**संक्षिप्त कसुरी :-** आपण लोहमार्ग पोलीस स्टेशन नागपूर येथे तपासी अंमलदार म्हणुन जबाबदारीच्या पदावर कार्यरत असून आपल्या कडे पोलीस रेपोस्टे नागपूर गु.रं.न. १४५/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि मधील आरोपी नामे जितु राजु कुशवाह वय २९ वर्ष रा. बालाजी कॉलनी, ग्वालीयर (म.प्र.) यास दिनांक ०५/०२/२०२४ रोजी अटक केल्यानंतर त्यांची ॲम्बीस प्रणालीवर फिंगरप्रिन्ट घेतले नाही. सदर बाबत प्रभारी अधिकारी यांना पुर्वकल्पना देणे आवश्यक होते. तरी आपण फिंगरप्रिन्ट न घेताच आरोपीस मा. न्यायालयात समक्ष हजर केल्याने मा. न्यायालयाने त्यास जामीनावर मुक्त केले. त्यामुळे आरोपीचा रेकॉर्ड तयार करणेस अडथळा निर्माण झालेला आहे.

तसेच आरोपींचे फिंगर प्रिन्ट का घेतले नाही या बाबत प्रभारी अधिकारी यांनी आपणास विचारणा केली असता मला मुख्यालयाला जमा करुन घ्या माझी येथे नोकरी करण्याची इच्छा नाही. असे बोलुन आपण असभ्य गैरवर्तन केलेले आहे. आपण तपासी अंमलदार म्हणुन महत्वाचे पदावर कार्यरत असून आपण आपले कर्तव्यात जाणूनबूजून हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आले असून हे कृत्य पोलीस खात्याचे शिस्तीला न शोभणारे असून खात्याचे शिस्तीचे उल्लंघन करणारे आहे.

वरील कसुरा बाबत आपणास रेल्वे पोलीस स्टेशन नागपूर यांचे संदर्भाकित क्रमांक -१ विचारणा पत्र देण्यात आले होते. त्यापत्रावर आपण वरील संदर्भाकीत क्रमांक-२ अन्वये स्पष्टीकरण सादर केले आहे. सदर प्रकरणात अंतिम निर्णय घेण्यापुर्वी दिनांक ०५/०४/२०२४ रोजी आपणास आज्ञांकित कक्षात वैयक्तीक सुनावणी करीता बोलावण्यात आले असता आपण हजर झाले आपणास बचावाची संधी दिली व काही सांगावयाचे आहे का ? याबाबत विचारणा केली असता आपण सदर गुन्हयात केलेल्या कसुरी बद्दल कथन केलेले स्पष्टीकरणाचा सहाणुभूतीपुर्वक अवलोकन केले असता ते समाधानकारक वाटत नसल्याने ते अस्विकार्य आहे. तरी आपण केलेल्या कसुरीचे स्वरुप पाहुन सबब प्रस्तुती प्रकरणी सांगोपांग विचार करता आपणास "सक्षम प्राधिकारी" म्हणुन मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**-: आदेश :-**

पोहवा /३१३ बाबुसिंग ठाकुर, नेमणुक रेल्वे पोलीस स्टेशन नागपूर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (२) अन्वये सक्षम प्राधिकारी या नात्याने दिलेल्या अधिकाराचा वापर करून आपण केलेल्या कसुरी बद्दल "सक्त ताकिद " शिक्षा देण्यात येत आहे. भविष्यात अश्या घटनांची पुनर्रावृत्ती होणार नाही याची आपण दक्षता घ्यावी.

पोहवा /३१३ बाबुसिंग ठाकुर, नेमणुक रेल्वे पोलीस स्टेशन नागपूर हे या आदेशामुळे व्यथित होत असल्यास ते ह्या आदेश प्राप्त तारखेपासुन ६० दिवसांचे आंत पोलीस महासंचालक, लोहमार्ग महाराष्ट्र राज्य. मुंबई यांना (दोन प्रतित) अपिल अर्ज सादर करु शकतात.

**०५) क्रमांक :पोअलोना/वि.चौ./कसुरी- पोउपनि श्री भलावी/१९२७/२०२४नागपूर दि.२३/०४/२०२४**

**-: अंतिम आदेश :-**

कसुदराचे नांव व पदनाम:- श्री. ओमप्रकाश भलावी पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक.रेल्वे पोलीस स्टेशन नागपूर

वाचा :- १) वाचक शाखा यांचे पत्र क्र.आर/२३/खुलासा/निरंक/२०२४, दिनांक २७/०२/२०२४
२)आपले जावक क्रमांक १५९६/२०२४ दिनांक २८/०२/२०२४रोजी सादर केलेले स्पष्टीकरण

**संक्षिप्त कसुरी :-** आपण रेल्वे पोलीस ठाणे नागपूर येथे कार्यरत असून आपल्याकडे पोलीस स्टेशन नागपूर येथे गु.रं.न. १०२/२०२४ कलम ३५४ (अ), २९४, ५०६ भा.दं.वि अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हा हा दिनांक २७.०१.२०२४ रोजी ट्रेन नं. क्रमांक १२८६० गितांजली एक्सप्रेसचे समारील जनरल कोच मध्ये घडलेला असून नमूद ट्रेन रेल्वे पोलीस स्टेशन बडनेरा येथे पोहचल्यानंतर गुन्हयातील आरोपीस रेल्वे पोलीस स्टेशन बडनेरा येथील स्टाफने ताब्यात घेवून उतरविले आहे. सदर बाबतचे सी.सी.टी. व्ही. फुटेज पुराव्याकामी तात्काळ प्राप्त करणे आवश्यक असतांना सुध्दा आपणाकडून सी.सी.टी.व्ही. फुटेज मिळण्याकामी दिनांक ०५/०२/२०२४ रोजी विलंबाने पत्रव्यवहार करण्यात आल्याने सी.सी.टी.व्ही. फुटेज उपलब्ध झाले नसल्याबाबत निर्दशनास येत आहे.

तरी सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असतांना सुध्दा आपण गुन्हा घडल्यानंतर तात्काळ सी.सी.टी.व्ही. फुटेज प्राप्त करण्याकरीता प्रयत्न केले नसल्यामुळे गुन्हयातील महत्वाचे पुरावे नष्ट झालेले आहेत. आपण कर्तव्यात अत्यंत आक्षेपार्ह, बेशिस्त, बेजबाबदार जाणून बूजून हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्याचे निर्दशनास आले आहे.

वरील कसुरा बाबत आपणास या वाचक शाखा यांचे पत्र संदर्भाकित क्रमांक -१ चे आदेशान्वये (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (२) अन्वये आपणास सदर गुन्हया बाबत खुलासा पत्र देण्यात आले होते. आपण वरील संदर्भाकीत क्रमांक-२ अन्वये स्पष्टीकरण सादर केले आहे. व आपण सादर केलेल्या स्पष्टीकरणाचा सहाणुभूतीपुर्वक अवलोकन केले असता ते समाधानकारक वाटत नसल्याने ते अस्विकार्य आहे. आपण केलेल्या कसुरीचे स्वरुप पाहुन सबब प्रस्तुत प्रकरणी सांगोपांग विचार करता आपणास "सक्षम प्राधिकारी" म्हणुन मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

—— > ——

**-: आदेश :-**

**श्री. ओमप्रकाश भलावी पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक रेल्वे पोलीस स्टेशन नागपूर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (२) अन्वये सक्षम प्राधिकारी या नात्याने दिलेल्या अधिकाराचा वापर करुन आपण केलेल्या कसुरी बद्दल "सक्त ताकिद " शिक्षा देण्यात येत आहे. भविष्यात अश्या घटनांची पुनर्रावृत्ती होणार नाही याची आपण दक्षता घ्यावी.**

**श्री. ओमप्रकाश भलावी पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक रेल्वे पोलीस स्टेशन नागपूर हे या आदेशामुळे व्यथित होत असल्यास ते हा आदेश प्राप्त तारखेपासुन ६० दिवसांचे आंत पोलीस महासंचालक, लोहमार्ग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना (दोन प्रतित) अपिल अर्ज सादर करु शकतात.**

## (७) सेवाप्रवेश /सेवानिवृत्ती /बडतर्फ

---०० निरंक ००---

## (८) संकिर्ण

---०० निरंक ००---

( डॉ. अक्षय शिंदे )
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग
नागपूर.

प्रति,

सर्व प्रभारी अधिकारी, रेपोस्टे/सर्व शाखा लोहमार्ग नागपूर

प्रत: -अपर पोलीस अधीक्षक, लोह. नागपूर/उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपूर/अकोला, लोह.नागपूर.